पुढारी

पुणे, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# जिल्हा स्तरावर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल

## वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांची माहिती; 'एमआयटी'च्या वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन

पुणे : पुढारी वृत्तसेवा



राज्याच्या ग्रामीण क्षेत्राबरोबरच छोट्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जावे, यासाठी खाजगी संस्थांनी समोर यावे. तसेच, ग्रामीण क्षेत्रातील रुग्णांवर मोठ्या शहरांऐवजी तिथेच उपचार होण्यासाठी राज्यात जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारीत चार दिवसीय ऑनलाइन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहणे म्हणून ते बोलत होते. या प्रसंगी खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार डॉ. अंबुमणी रामदोस, सिक्कीमचे आरोग्यमंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्य मंत्री असिया नक्काश आदी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, ''कोरोनाच्या काळात आरोग्य क्षेत्रात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांनी मोठी समाजसेवी केली आहे. आजही चांगले डॉक्टर, नर्स, स्पेशालिस्ट आणि सुपरस्पेशालिस्ट डॉक्टरांची गरज आहे. आरोग्य क्षेत्राला संजीवनी देणारा हा मंच आहे. यामुळे वैद्यकीय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठी सुधारणा होईल. सरकार आणि खाजगी संस्थांनी एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता आहे.''

डॉ. अंबुमणी रामदोस म्हणाले, ''एकीकडे परिवर्तनीय वातावरण, ग्लोबल चेंज आणि ग्लोबल वार्मिंग यामुळे सृष्टीवर वेगवेगळे आजार येतच राहणार आहेत. अशावेळेस वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन व नवनिर्मिती होणे गरजचे आहे.''

डॉ. भामरे म्हणाले, ''देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी वैद्यकीय क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. कोरोनाच्या काळात वैद्यकीय क्षेत्रातील बऱ्याच उणिवा जाणवल्या. त्यात सुधारणा करून नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील सर्व थेरपीनी कार्य करावे.''

डॉ. शर्मा म्हणाले, ''देशाच्या विकासाठी हेल्थ केयर इको सिस्टीम महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारताचा नारा दिला आहे. त्यामुळे आम्ही देशाला मेडिकल टुरिझम बनवू शकतो. यासाठी आम्हाला वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर, नर्स, चांगले इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करणे गरजचे आहे.'' डॉ. एन.टी.राव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी.एस. कुचेकर यांनी स्वागतपर भाषण केले. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. रवींद्रनाथ पाटील यांनी आभार मानले.

प्रभात
पुणे, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून आरोग्य यंत्रणा उभारणार



मुंबई, दि. २१ - संसर्गावरील उपचारांबरोबरच प्रतिबंधात्मक उपायांनी रोगावर मात केली जाऊ शकते हे दिसून येत असते. मात्र, कोविडनंतर राज्यातील सामान्य नागरिकांचा वैद्यकीय सेवेवरील विश्वास वाढण्यास मदत होत आहे. येणाऱ्या काळात राज्यात वैद्यकीय सुविधांचे जाळे निर्माण करण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसीतर्फे २१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन या विषयावर ४ दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट आयोजित केली आहे. यावेळी देशमुख बोलत होते.

देशमुख म्हणाले, जगभरात आता आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील नागरिकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून येणाऱ्या काळात गडचिरोली, उस्मानाबाद, सातारा, परभणी आणि जालना यासारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि शासकीय वैद्यकीय रुग्णालय उभारण्यात येणार आहे.

आज कोविडवर लस जगभरात आली असून महाराष्ट्रात तर लसीकरणाचा पहिला टप्पा सुरु झाला आहे. मात्र जगभरात सॅनिटायझरचा वापर, मास्क घालणे आणि सोशल डिस्टन्सिंग पाळणे हे नियम सारखेच पाळले गेले. त्यामुळेच येणाऱ्या काळातही आपण हे

**वैद्यकीय सुविधांचे जाळे निर्माण करण्यास प्राधान्य**

नियम नवीन जीवनशैली स्वीकारताना पाळणे आवश्यक आहे. २०२० हे वर्ष आपल्या सर्वांसाठी कठीण होते. मात्र २०२१ हे वर्ष आपल्या सर्वांसाठीच सकारात्मक ठरणार आहे. कारण कोविड विषाणूवर लस आली असून पहिल्या टप्प्यात देशभरातील आरोग्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना लस दिली जात आहे. गेल्या वर्षाच्या सुरुवातीला महाराष्ट्रासह जगभरात आलेल्या कोविड-१९ विरुध्दच्या लढाईत सर्वांत मोठा वाटा हा डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कामगार, अंगणवाडी सेविका, यांच्यासह सर्वच शासकीय यंत्रणांनी महत्वाची भूमिका बजावली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

बातम्यांचा राजा
जनप्रवास
पुणे, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# जिल्ह्यात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणार

**पुणे**
**जनप्रवास प्रतिनिधी**

- वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांचे उद्गार
- वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन



राज्याच्या ग्रामीण क्षेत्राबरोबरच छोट्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जावे. त्यासाठी खाजगी संस्थांनी समोर यावे. हे केवळ राज्यापूरतेच मर्यादित नाही तर संपूर्ण भारतात व्हावे. तसेच, ग्रामीण क्षेत्रातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरात नेण्याऐवजी त्यांचा तिथेच योग्य उपचार व्हावा. यासाठी राज्याच्या संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहेत.असे उद्गार राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी काढले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद आरोग्य सेवा परिसंस्थेम ध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे या विषयावर २४ जानेवारीपर्यंत चालेल. विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने ही पार्लमेंट होत आहे.

या प्रसंगी खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार डॉ. अंबुमणी रामदोस, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथि म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते.

याप्रसंगी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ.एन.टी.राव, प्र कुलगुरू प्रा.डॉ. मिलिंद पांडे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस. कुचेकर व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील हे उपस्थित होते.

अमित देशमुख म्हणाले,कोरोनाच्या काळात आरोग्य क्षेत्रात कार्यरत सर्व कर्मचार्यांनी खूप मोठी समजसेवी केली आहे. आज ही आम्हाला चांगले डॉक्टर्स, नर्सेस, स्पेशालिस्ट्स् आणि सुपरस्पेशालिस्ट डॉक्टरांची गरज आहे. आरोग्य क्षेत्राला संजीवनी देणारा हा मंच आहे. यामुळे वैद्यकीय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठी सुधारणा होईल. सरकार आणि खाजगी संस्थांनी एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता आहे. आज भारतातील डॉक्टरांचा संपूर्ण जगात मोठा आदर सन्मान होत आहे.

डॉ.एन.टी.राव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी.एस. कुचेकर स्वागतपर भाषण केले.

प्रा. गौतम बापट यांनी सूत्र संचालन केले. रविंद्रनाथ पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणार

## वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांचे उद्‌गार : वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्‌घाटन

सुराज्य/पुणे



राज्याच्या ग्रामीण क्षेत्राबरोबरच छोट्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जावे. त्यासाठी खाजगी संस्थांनी समोर यावे. हे केवळ राज्यापुरतेच मर्यादित नाही तर संपूर्ण भारतात व्हावे. तसेच, ग्रामीण क्षेत्रातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरात नेण्याऐवजी त्यांना तिथेच योग्य उपचार व्हावा. यासाठी राज्याच्या संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहेत.असे उद्गार राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी काढले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे या विषयावर २४ जानेवारीपर्यंत चालेल. विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने ही पार्लमेंट होत आहे.

या प्रसंगी खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार डॉ. अंबुमणी रामदोस, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. याप्रसंगी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ.एन.टी.राव, प्र कुलगुरू प्रा.डॉ. मिलिंद पांडे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस. कुचेकर व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील हे उपस्थित होते. यावेळी पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून संवाद साधतांना म्हणाले, देशात आता आत्मनिर्भर भारताचा नारा दिला आहे. त्यानुसार संपूर्ण क्षेत्रात प्रगती होतांना दिसत आहे. सिरम इन्स्टिटयूटने लस निर्मिती करून संपूर्ण जगाला ती पुरवीत आहेत. आज वैद्यकीय क्षेत्रात मोठे संशोधन होतांना दिसत आहे. तंत्र ज्ञानामुळे ईसीजी सारख्या खिशात ठेवणाऱ्या मशीनची निर्मिती करून मानवाला देणगी दिली आहे.

डॉ.एन.टी.राव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी.एस. कुचेकर स्वागतपर भाषण केले.

प्रा. गौतम बापट यांनी सूत्र संचालन केले. रविंद्रनाथ पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

मराठवाडा नेता
लातूर, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणार

## वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांचे उद्गार; वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन

पुणे, दि. २१ :....

राज्याच्या ग्रामीण क्षेत्राबरोबरच छोट्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जावे. त्यासाठी खाजगी संस्थांनी समोर यावे. हे केवळ राज्यापूरतेच मर्यादित नाही तर संपूर्ण भारतात व्हावे. तसेच, ग्रामीण क्षेत्रातील रूग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरात नेण्याऐवजी त्यांचा तिथेच योग्य उपचार व्हावा. यासाठी राज्याच्या संपूर्ण जिल्हाच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहेत, असे उद्गार राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी काढले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे या विषयावर २४ जानेवारीपर्यंत चालेल. विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने ही पार्लमेंट होत आहे.

या प्रसंगी खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार डॉ. अंबुमणी रामदोस, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथि म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते.



यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ.एन.टी.राव, प्र कुलगुरू प्रा.डॉ. मिलिंद पांडे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस. कुचेकर व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील हे उपस्थित होते.

अमित देशमुख म्हणाले,कोरोनाच्या काळात आरोग्य क्षेत्रात कार्यरत सर्व कर्मचार्यांनी खूप मोठी समाजसेवी केली आहे. आज ही आम्हाला चांगले डॉक्टर्स, नर्सेस, स्पेशालिस्ट्स् आणि सुपरस्पेशालिस्ट डॉक्टरांची गरज आहे. आरोग्य क्षेत्राला संजीवनी देणारा हा मंच आहे. यामुळे वैद्यकीय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठी सुधारणा होईल. सरकार आणि खाजगी संस्थांनी एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता आहे. आज भारतातील डॉक्टरांचा संपूर्ण जगात मोठा आदर सन्मान होत आहे.

दैनिक
सत्यमत
लातूर, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# वैद्यकीय सुविधांचे जाळे निर्माण करण्याला प्राधान्य : देशमुख

**मुंबई :** संसर्गावरील उपचारांबरोबरच प्रतिबंधात्मक



उपायांनी मात केली जाऊ शकते हे दिसून येत असते. मात्र कोविडनंतर राज्यातील सामान्य नागरिकांचा वैद्यकीय सेवेवरील विश्वास वाढण्यास मदत होत आहे. येणाऱ्या काळात राज्यात वैद्यकीय सुविधांचे जाळे निर्माण करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी आज सांगितले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिर्व्हसिटीच्या स्कूल ऑफ फार्मसीतर्फे २१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन या विषयावर एकूण ४ दिवसांची ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट आयोजित केली आहे. त्यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री देशमुख बोलत होते.

देशमुख म्हणाले की, येणाऱ्या काळात गडचिरोली, उस्मानाबाद, सातारा, परभणी आणि जालना यासारख्या जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि शासकीय वैद्यकीय रुग्णालय उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पुण्यातील विश्वराज हॉस्पीटल, तळेगाव येथील माईर्समायमर वैद्यकीय महाविद्यालय आणि लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसाचे वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट भरविले गेले आहे. आज सकाळी या पार्लमेंटचे ऑनलाईन उद्घाटन झाले. एमआयटीचे कार्याध्यक्ष राहुल कराड यांनी या पार्लमेंटचे आयोजन केले आहे. सिक्कीमचे आरोग्यमंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्यमंत्री असिया नक्काश, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, खासदार डॉ. सुभाष भामरे, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, महाराष्ट्राच्या कोविड-१९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक, डॉ. आदिती कराड यावेळी उपस्थित होते.

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

राजसत्ता

लातूर, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# सुविधांचे जाळे निर्माण करण्याला प्राधान्य- अमित देशमुख

मुंबई – संसर्गावरील उपचारांबरोबरच प्रतिबंधात्मक उपायांनी मात केली जाऊ शकते हे दिसून येत असते. मात्र कोविडनंतर राज्यातील सामान्य नागरिकांचा वैद्यकीय सेवेवरील विश्वास वाढण्यास मदत होत आहे. येणाऱ्या काळात राज्यात वैद्यकीय सुविधांचे जाळे निर्माण करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी आज सांगितले.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसीतर्फे २१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन या विषयावर एकूण ४ दिवसांची ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट आयोजित केली आहे. त्यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. देशमुख बोलत होते.

श्री. देशमुख म्हणाले की, जगभरात आता आरोग्याला केंद्रबिंदू ठेवून आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील नागरिकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून येणाऱ्या काळात गडचिरोली, उस्मानाबाद, सातारा, परभणी आणि जालना यासारख्या जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि शासकीय वैद्यकीय रुग्णालय उभारण्यात येणार आहे. मला येथे प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की, आज कोविडवर लस जगभरात आली असून महाराष्ट्रात तर लसीकरणाचा पहिला टप्पा सुरु झाला आहे. मात्र जगभरात सॅनिटायझरचा वापर, मास्क घालणे आणि सोशल डिस्टन्सिंग पाळणे हे नियम सारखेच पाळले गेले. त्यामुळेच येणाऱ्या काळातही आपण हे नियम नवीन जीवनशैली स्वीकारताना पाळणे आवश्यक आहे.

२०२० हे वर्ष आपल्या सर्वांसाठी कठीण होते. मात्र २०२१ हे वर्ष आपल्या सर्वांसाठीच सकारात्मक ठरणार आहे कारण कोविड विषाणूवर लस आली असून पहिल्या टप्प्यात देशभरातील आरोग्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना लस दिली जात आहे.गेल्या वर्षाच्या सुरुवातीला महाराष्ट्रासह जगभरात आलेल्या कोविड–१९ विरुध्दच्या लढाईत सर्वात मोठा वाटा हा डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कामगार, अंगणवाडी सेविका, यांच्यासह सर्वच शासकीय यंत्रणांनी महत्वाची भूमिका बजावली असल्याचेही श्री. देशमुख यांनी यावेळी सांगितले.

खासदार डॉ. रामदास यांनी सुध्दा चांगली आरोग्य यंत्रणा किंवा आरोग्य सुविधा उभारण्याबरोबरच आपल्या नागरिकांना येणाऱ्या काळात चांगल्या पायाभूत सुविधा, प्रदूषणमुक्त वातावरण देणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात सुदृढ आरोग्य यंत्रणा उभारण्यावर केंद्र आणि राज्य शासन भर देत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या हेल्थ पार्लमेंटमध्ये बोलताना डॉ. ओक म्हणाले की, सध्या कोविड रुग्णांची संख्या कमी होताना दिसत असून आपल्याला सर्वांनीच न्यू नॉर्मल जीवनशैली स्वीकारताना येणाऱ्या काळात मास्क, सॅनिटायझर आणि सोशल डिस्टन्सिंग या गोष्टी पाळणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळात आरोग्याला प्राधान्य देत असताना आपण सर्वांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळण्याबरोबरच ऑनलाईन शिक्षणावर अधिकाधिक भर देणे आवश्यक आहे.

देशभरातील आरोग्य सेवेत सुधारणा करणे, सर्वसामान्यांना चांगल्या आरोग्य सुविधा वाजवी दरात उपलब्ध करण्यावर येणाऱ्या काळात कसा भर देण्यात येणे आवश्यक आहे हाच या पार्लमेंटचा मुख्य विषय होता.

पुण्यातील विश्वराज हॉस्पीटल, तळेगाव येथील माईर्समायमर वैद्यकीय महाविद्यालय आणि लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसाचे वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट भरविले गेले आहे. आज सकाळी या पार्लमेंटचे ऑनलाईन उद्घाटन झाले.एमआयटीचे कार्याध्यक्ष राहुल कराड यांनी या पार्लमेंटचे आयोजन केले आहे. सिक्कीमचे आरोग्यमंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्यमंत्री असिया नक्काश, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, खासदार डॉ. सुभाष भामरे, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, महाराष्ट्राच्या कोविड–१९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक, डॉ. आदिती कराड यावेळी उपस्थित होते.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

दैनिक देशभक्त संवाद

लातूर, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणार-ना. अमित देशमुख

पुणे :- राज्याच्या ग्रामीण क्षेत्राबरोबरच छोट्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जावे. त्यासाठी खाजगी संस्थांनी समोर यावे. हे केवळ राज्यापूरतेच मर्यादित नाही तर संपूर्ण भारतात व्हावे. तसेच, ग्रामीण क्षेत्रातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरात नेण्याऐवजी त्यांचा तिथेच योग्य उपचार व्हावा. यासाठी राज्याच्या संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहेत.असे उद्गार राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी काढले.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे या विषयावर २४ जानेवारीपर्यंत चालेल. विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि माईर्स

▶▶ पान ४ वर

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

दैनिक नांदेड एकजूट

नांदेड, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

## वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन

# जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणार :अमित देशमुख

पुणे : राज्याच्या ग्रामीण क्षेत्राबरोबरच छोट्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षण दिले जावे. त्यासाठी खाजगी संस्थांनी समोर यावे. हे केवळ राज्यापूरतेच मर्यादित नाही तर संपूर्ण भारतात व्हावे. तसेच, ग्रामीण क्षेत्रातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरात नेण्याऐवजी त्यांचा तिथेच योग्य उपचार व्हावा. यासाठी राज्याच्या संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहेत.असे उद्गार राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी काढले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे या विषयावर २४ जानेवारीपर्यंत चालेल. विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने ही पार्लमेंट होत आहे.

या प्रसंगी खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार डॉ. अंबुमणी रामदोस, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरच्या आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथि म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते.

यांप्रसंगी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ.एन.टी.राव, प्र कुलगुरू



प्रा.डॉ. मिलिंद पांडे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस.कुचेकर व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील हे उपस्थित होते.

अमित देशमुख म्हणाले,कोरोनाच्या काळात आरोग्य क्षेत्रात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांनी खूप मोठी समाजसेवी केली आहे. आज ही आम्हाला चांगले डॉक्टर्स, नर्सेस, स्पेशालिस्ट्स् आणि सुपरस्पेशालिस्ट डॉक्टरांची गरज आहे. आरोग्य क्षेत्राला संजीवनी देणारा हा मंच आहे. यामुळे वैद्यकीय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठी सुधारणा होईल.पान ४ वर >>

देशोन्नती
वाशिम, शुक्रवार, दि.२२ जानेवारी २०२१

# चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे आयोजन

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसीचा उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मंगरुळपीर** ■ एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट २१ ते २४ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे हा या पार्लमेंटचा प्रमुख विषय आहे.

शिवराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने हे पार्लमेंट भरविले जात आहे. वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन २१ जानेवारी रोजी सकाळी ११ झाले आहे. या समारंभासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, आरोग्य मंत्री असिया नक्काश, शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. रविवार, २४ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वा. या वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचा समारोप होणार आहे. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अश ?विनी कुमार चौबे, महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे, ओरिसाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नाबा किशोर दास, खासदार भारती पवार, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आरोग्य क्षेत्रातील नियामक सुधारणा या पार्लमेंटमध्ये महाराष्ट्राच्या आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. प्रदिप कुमार व्यास, पद्मश्री डॉ. शशांक जोशी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजीच्या संचालिका डॉ. प्रिया अब्राहिम, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक डॉ. सुनिल गैरोला, फोर्टीस हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल पंडित, रिलायन्स फाउंडेशनचे वैद्यकीय सल्लागार डॉ. गुसद दवेर, संपादिका अनुराधा मस्करेन्हास, प्राध्यापक प्रतिक राज, प्रो. डॉ. गौतम सेन, डॉ. वसंत नागवेकर, पद्मभूषण डॉ. देवीशेट्टी, डॉ. पराशा कोठारी, डॉ. जे.ए. जलाल, डॉ. एस.पी. कलंत्री, डॉ. जरिर उदवाडिया, डॉ. कृष्ण खंजर, डॉ. अमित नागपाल, डॉ. मंजिरी घराट, पद्मश्री डॉ. परवेज ग्रांट, डॉ. पराग संचेती, डॉ. सुचित्रा नागरे, डॉ. अदिती कराड, राजीव येरवडेकर, डॉ. दिलीप गोडे, ले. जनरल डॉ. एम.डी. व्यंकटेश, डॉ. कन्नन रंगरामानुजम, आरोग्य मंत्री डॉ. राजीव सैझल, डॉ.अरुण जामकर, डॉ.ओम श्रीवास्तव, डॉ.अजित देशपांडे, राजीव नाथ, डॉ. मृदुला बेले, डॉ. हेमंत भंसाली, शिवकुमार कुडाले, पद्मश्री शशांक जोशी, पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ अभिजित राय चौधरी, डॉ.वाय. के. गुप्ता, डॉ. जयंत खंदारे, पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, पद्मश्री डॉ.दर्शन शंकर, आचार्य बाल कृष्णन, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. रोहित महादेव साने, डॉ. सुरेश बी. पाटणकर, डॉ. जवाहर जे. शाह, डॉ. नितिन कर्णिक, डॉ. धनंजय केळकर, डॉ. समीर जोग, डॉ. रमेश भ्रमाल, डॉ. मोहन जोशी, डॉ लाल हिंगोरानी, संजय सिंग, अरुण खन्ना, डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. दिलीप म्हैसेकर, डॉ. रवि वानखेडकर, सुरेश शेट्टी या पार्लमेंटमध्ये विचार मांडतील. टास्क फोर्स कोविड १९ चे अध्यक्ष डॉ. संजय ओक, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. एन.टी.राव फ्ळपश), प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, सल्लागार प्रा. डी.पी.आपटे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस.कुचेकर, व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. (ता.प्र.)

> महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे आयोजन करण्यात येत आहे. या वर्ल्ड पार्लमेंटध्ये १० सत्रे आयोजित केली आहेत.